**नगर परिषद मलकापूर जि.बुलढाणा**

**प्रशासकीय सभा**

ठराव क्रं.1 दि.17/3/2022

1. **वर्ष 2022-23 मध्ये संगणक देखभाल व दुरुस्ती व नविन साहित्य करिता वार्षीक दर मागविणेबाबत.**

नगर परिषद,मलकापूर मध्ये विविध विभागा अंतर्गत त्यामध्ये जन्म-मृत्यू,मालमत्ता कर व पाणी कर,लेखा विभाग,सामान्य प्रशासन,आस्थापना,आरोग्य,बांधकाम ,नियोजन विभाग,सभा कामकाज विभाग,पाणी पुरवठा विभाग ,विदयुत विभाग,नागरी उपजिवीका अभियान इत्यादी विभाग मध्ये सगणक वर सेवा तसेच दैनदिन कामकाज करण्यात येते त्यामुळे नमूद सर्व विभागात संगणक,प्रिंटर,इंटरनेट व त्यासंबंधी इतर बाबी वर्षभर पुरवाव्या लागतात

तसेच बरेच वेळेस सण,उत्सव,जयंती किंवा इतर विशिष्ट परिस्थितीत काही वेळेस सी.सी.टी.व्ही संवेदनशील ठिकाणी बसविणे बाबत पोलीस स्टेशन,तहसील कार्यालय किंवा वरिष्ठ कार्यालय यांचे कडून सांगण्यात येते अश्या प्रकारे कार्यालयीन कामकाज व इतर कायदा व सुव्यवस्थाशी निगडीत बाबी करिता सेवा पुरविण्यात येतात ही कामे करताना बरेच वेळेस साहित्या मध्ये अडचणी किंवा नादुरुस्त होतात त्यामुळे त्याची दुरुस्ती व देखभाल करणे आवश्यक असते.तसेच कारटैज भरणे,त्याची दुरुस्ती किंवा नविन घेणे,संगणक दुरुस्ती किंवा नविन घेणे ही कामे वारंवार गरजेनुसार करावी लागतात.

तसेच 2022-23 मध्ये नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक आहेत त्यामुळे मोठया प्रमाणात साहित्याची गरज निर्माण होते जसे की,सी.सी.टी.व्ही,संगणक,प्रिंटर व इतर साहित्य करिता सदर कामासाठी वार्षीक दर करार पध्दतीने दर मागवून घेतल्यास साहित्याची वेळेवर दुरुस्ती करणे व नविन साहित्य गरजेनुसार मागविणे मध्ये वेळ व प्रक्रिया करणे ची बचत होते त्याकरिता वारंवार दर मागविणे ची आवश्यकता पडणार नाही.

करिता उपरोक्त नमूद मलकापूर नगर परिषद अंतर्गत विभाग करिता वर्ष 2022-23 करिता अंदाजित खर्च 8 लक्ष पर्यंत असू शकतो. सदर चे कामाकरिता येणारा खर्च न.प.निधी तून करणे योग्य राहिल तरी वर्ष 2022-23 मध्ये संगणक देखभाल व दुरुस्ती व नविन साहित्य करिता वार्षीक दर मागविणे आवश्यक आहे. असे संगणक अभियंता व मुख्याधिकारी यांचे टिप्पणीत नमूद केले आहे.यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,वरील सर्व बाबी विचारात घेवून नगर परिषद विविध विभागांकरिता वर्ष 2022-23 मध्ये संगणक देखभाल व दुरुस्ती व नविन साहित्य करिता वार्षीक दर मागविणे आवश्यक असल्याने वार्षीक दर मागविण्यास व त्यासाठी आवश्यक ती निविदा प्रक्रिया करण्यास तसेच सदर कामे न.प.निधीतून करण्यास व येणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.

**(आर.यु.सुरडकर)**
**प्रशासक,**
**नगर परिषद,मलकापूर**

Scanned with CamScanner